पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर
पोलीस शिपाई भरती व चालक पोलीस शिपाई भरती सन २०१९

प्रेसनोट

पोलीस आयुक्त ठाणे शहर आस्थापनेवरील पोलीस शिपाई संवर्गाची १४७ रिक्त पदे व चालक पोलीस शिपाई संवर्गाची १२६ रिक्त पदे भरण्यासाठी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील दि.३०/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये पोलीस शिपाई व चालक पोलीस शिपाई पदांच्या जाहिरातीमध्ये सुधारणा करण्याबाबत दि.०५/०८/२०२१ रोजी विविध वृत्तपत्रांमध्ये शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदर शुध्दीपत्रकानुसार उमेदवारांनी युजर आयडी व पासवर्ड बदलणे तसेच एसईबीसी प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्टया दुर्बल घटक हा विकल्प निवडण्याची सुविधा दि.१५/०८/२०२१ पर्यंत उपलब्ध राहणार होती.

काही उमेदवारांनी त्यांचा ई-मेल आयडी विसरलेला आहे किंवा अन्य कारणास्तव हरविलेला आहे अशा प्रकारच्या तक्रारी पोलीस महासंचालक कार्यालयास व या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

त्या दृष्टीने अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.११/०८/२०१९ रोजी उमेदवारांसाठी युजर आयडी व पासवर्ड बदलणे तसेच एसईबीसी प्रवर्गाचा विकल्प देण्यासाठी प्रसिध्दीपत्रक देण्यात आलेले असून त्याकरीता दि.२२/०८/२०२१ रोजी २४:०० वाजेपर्यंत मुदत वाढवून देण्यात आलेली आहे.

उमेदवारांच्या माहितीकरीता खालील प्रमाणे युजर आय डी व पासवर्ड बदलण्याची क्रमवारी देण्यात येत आहे.

- उमेदवारांनी प्रथम **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावरील **Police Corner → पोलीस भरती → पोलीस भरती-२०१९** हा ऑप्शन सिलेक्ट करावा.
- **पोलीस भरती-२०१९ हा ऑप्शन सिलेक्ट केल्यानंतर ठाणे शहर (Thane City) नाव असलेल्या Recruitment Link** वर क्लिक करावे.
- Recruitment Link वर क्लिक केल्यानंतर दर्शनी भागावर(Display) →**Guide to the Portal** यावर युजर आयडी व पासवर्ड बदलणे तसेच एसईबीसी प्रवर्गातील उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. ज्या उमेदवारांना आवेदन अर्जाबाबत युजर आयडी व पासवर्ड बदलणे तसेच एसईबीसी प्रवर्गातील उमेदवारांनी खुला किंवा इडब्ल्युएस असा विकल्प निवडणे याबाबत अडचणी येत असतील अशा उमेदवारांनी वरील नवीन मार्गदर्शक सूचनांचा लाभ घ्यावा.
- उमेदवारांना काही अडचणी असल्यास **१८००२१००३०९** या हेल्पलाईन क्रमांकावर सोमवार ते शनिवार सकाळी १०:०० ते सायं.०६:०० या वेळेत संपर्क साधावा.
